आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

९ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या ७ हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- पोषण आहाराअंतर्गत फोर्टिफाईड तांदळाच्या पुरवठ्याला केंद्रसरकारची मंजुरी
- भारतीय रिझर्व बँकेच्या पतधोरण आढाव्यात सलग दहाव्यांदा रेपो दर साडेसहा टक्क्यावर कायम

**आणि**

- यंदाचा रसायनशास्त्रातला नोबेल पुरस्कार डेव्हिड बेकर, जॉन जंपर आणि डेमिस हसाबिस यांना जाहीर

**<><><><><>**

राज्यात गेल्या काही वर्षात विकासाचे अनेक प्रकल्प सुरू झाले आणि त्यातले अनेक पूर्ण झाले आहेत, यापूर्वी एवढा वेगवान विकास महाराष्ट्राने पाहिलेला नाही, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राज्यातल्या सुमारे सात हजार सहाशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आज प्रधानमंत्र्यांनी दूरस्थ पद्धतीने केली त्यावेळी ते बोलत होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा हे मराठी माणसाचं स्वप्न नुकतंच केंद्रसरकारच्या निर्णयामुळे साकार झाल्याचा उल्लेख त्यांनी केला.

राज्यातल्या दहा वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी केलं. ही महाविद्यालयं मुंबई, अंबरनाथ, नाशिक, जालना, बुलढाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा आणि गडचिरोली इथं सुरू होणार आहेत. या महाविद्यालयांमध्ये

विद्यार्थ्यांसाठी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागा ९०० ने वाढणार असून, एकूण ३५ महाविद्यालयात मिळून दरवर्षी चार हजार ८५० जागा उपलब्ध होणार आहेत.

नागपूरच्या नवीन डॉ बाबासाहेब आंबेडकर विमानतळाचं आणि शिर्डीच्या नवीन एकात्मिक विमानतळ टर्मिनलचं भूमीपूजन तसंच भारतीय कौशल्य संस्था आणि विद्या समीक्षा केंद्राचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.

दूरदृष्यप्रणालीमार्फत झालेल्या या कार्यक्रमात विविध ठिकाणाहून विविध मान्यवर सहभागी झाले होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन मुंबईतून तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार रायगड जिल्ह्यातल्या माणगाव इथून कार्यक्रमात भाग घेतला.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस नागपूर इथून कार्यक्रमात सहभागी झाले. शिर्डी विमानतळावरच्या कार्यक्रमाला महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, स्थानिक लोकप्रतिनिधी तसंच विमानतळ प्राधिकरणाचे आणि इतर वरिष्ठ प्रशासकीय उपस्थित होते. या विमानतळाचं नामकरण साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळ असं झाल्याचं मंत्री विखे पाटील यांनी यावेळी जाहीर केलं.

गडचिरोली, हिंगोली, भंडारा आणि इतर वैद्यकीय महाविद्यालयांच्या उद्घाटन कार्यक्रमाचं आयोजन ऑनलाईन पद्धतीनं संबंधित ठिकाणी करण्यात आलं होतं. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी वर्ग दूरस्थ पदधतीनं कार्यक्रमाला उपस्थित राहिले. या कार्यक्रमांच्या बातम्या आमच्या संबंधित जिल्ह्यातल्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

नाशिकमधे वैद्यकीय महाविद्यालय झाल्याबद्दल महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू माधुरी कानिटकर यांनी आनंद व्यक्त केला..

**होल्ड--बाईट- माधुरी कानिटकर**

**<><><><><>**

पोषण आहाराअंतर्गत फोर्टिफाईड, अर्थात पौष्टिक तांदळाच्या पुरवठ्याला केंद्रसरकारने आज मंजुरी दिली. मंत्रिमंडळ बैठकीनंतर नवी दिल्ली इथं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. सिंधु संस्कृतीतलं प्राचीन बंदर लोथल इथे राष्ट्रीय सागरी वारसा संकुल विकसित करायलाही केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना वैष्णव म्हणाले की, भारताच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सागरी वारशाला जतन करण्याचा या प्रस्तावाचा उद्देश आहे. या संकुलात लाईट हाऊस संग्रहालयाचा समावेश असेल, असंही वैष्णव म्हणाले.

यासोबत राजस्थान आणि पंजाबच्या सीमावर्ती भागात २ हजार २८० किलोमीटर लांबीच्या रस्ते बांधणीला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. या प्रकल्पासाठी ४ हजार ४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येणार आहे. या निर्णयामुळे रस्ते आणि दूरसंचार संपर्क, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षणासारख्या पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळेल, असं अश्विनी वैष्णव म्हणाले.

**<><><><><>**

राज्याची आर्थिक परिस्थिती मजबूत असल्याने लाडकी बहीणसह कोणतीही योजना बंद करण्यात येणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिली. पिंपरी-चिंचवड शहरातल्या विकासकामांचे भूमीपूजन, उद्घाटन आणि लोकार्पण त्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी नाव नोंदणी केलेल्या आणि सध्या विविध आस्थापनांमधे इंटर्नशिप करत असलेल्या ४६ हजार विद्यार्थ्यांना विद्यावेतनाचा पहिला हप्ता थेट त्यांच्या बँक खात्यात मिळणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आज वार्ताहर

परिषदेत ही माहिती दिली. यासाठी राज्य सरकार ४२ कोटी रुपये वितरित करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मिळणारं आरोग्य कवच आता प्रति कुटुंब प्रति वर्ष दीड लाख रुपयांवरून ५ लाख रुपयांपर्यंत वाढलं आहे असं केंद्रीय आयुष आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली. त्यांच्या अध्यक्षतेखाली 'आयुष्मान संवाद' हा आयुष्मान भारत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीचा कार्यक्रम नुकताच बुलढाण्यात झाला, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेच्या पतधोरणाचा द्वैमासिक आढावा आज जाहीर झाला. व्याजदरात कोणतेही बदल न करण्याचा निर्णय बँकेनं सलग १०व्या आढाव्यात घेतला आहे. त्यामुळे रेपो दर साडेसहा टक्क्यांवर, स्टँडींग डिपॉझिट फॅसिलिटी दर सव्वा सहा टक्क्यांवर आणि मार्जिनल डिपॉझिट फॅसिलिटी दर पावणे सात टक्क्यांवर कायम आहे. रिझर्व बँकेच्या पतधोरण विषयक समितीची बैठक गेल्या सोमवारपासून मुंबईत झाली. त्या नंतर हा आढावा जाहीर करण्यात आला आहे. यावेळच्या चलनविषयक धोरणात चलन फुगवट्याबाबत सध्या तटस्थ भूमिका स्वीकारण्याचा निर्णयही पतधोरण समितीने घेतला. किरकोळ चलनफुगवट्याचा दर चार टक्के पर्यंत रोखण्याच्या दृष्टीनं आणि विकासाला पाठबळ देण्याच्या दृष्टीनं हा निर्णय घेतल्याचं समितीने म्हटलं आहे.

**<><><><><>**

यंदाचा रसायनशास्त्रातला नोबेल पुरस्कार डेव्हिड बेकर, जॉन जंपर आणि डेमिस हसाबिस या तिघांना प्रथिनांची रचना आणि आरेखन यातल्या संशोधनासाठी जाहीर झाला आहे. अमेरिकेत सिएटलमधल्या वॉशिंग्टन विद्यापीठात

कार्यरत बेकर पुरस्काराची निम्मी रक्कम यांना देण्यात येणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता विकासात प्रथिनांच्या गुंतागुंतीच्या रचना उकलणारं संशोधन करणारे जंपर आणि हसाबीस यांना उर्वरित रक्कम विभागून देण्यात येणार असल्याचं रॉयल स्वीडीश अकॅडेमी ऑफ सायन्सेसने जाहीर केलं. हे दोन्ही वैज्ञानिक लंडनच्या गूगल डीपमाईंड प्रयोगशाळेत काम करतात.

<><><><>

सरळ सेवा भरती सन २०१९ अंतर्गत अतिरिक्त यादीतल्या एकूण १ हजार ५८ उमेदवारांना एसटीच्या सेवेत चालक, आणि वाहक या पदांवर सामावून घेतलं जाणार आहे. एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी ही माहिती दिली.

या भर्तीमध्ये निवड झालेल्यांपैकी गैरहजर अथवा अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या ऐवजी त्याच भर्तीमधल्या प्रतीक्षा यादीवरच्या सुमारे ३३७ उमेदवारांना नेमणूक देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. तसंच, प्रतीक्षा यादीवरच्या उर्वरित सर्व ७२१ उमेदवारांना आवश्यकतेप्रमाणे सेवेत सामावून घेण्याचा निर्णय झाला आहे, असं एसटी महामंडळाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

येत्या विधानसभा निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडीने आपल्या दहा उमेदवारांची यादी आज जाहीर केली. यात मलकापूर, बाळापूर, परभणी, छत्रपती संभाजीनगर मध्य, गंगापूर, कल्याण पश्चिम, हडपसर, माण, शिरोळ आणि सांगली या जागांसाठी पक्षानं उमेदवारांची घोषणा केली आहे.

<><><><>

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी काँग्रेसनं तयार केलेल्या चित्ररथाचं उद्घाटन आज मुंबईत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते, आणि विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत झालं.

राज्यातल्या महायुती सरकारनं गेल्या अडीच वर्षात महाराष्ट्रातले उद्योग गुजरातला पाठवले, राज्यातली साडेसात साख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ५ लाख रोजगार गुजरातनं पळवले, असा आरोप पटोले यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

नाशिक इथे वनखात्याने म्हसरुळ शिवारात बांधलेल्या वन्यप्राणी उपचार केंद्राचं लोकार्पण आज नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांनी केलं. या केंद्रामधये प्रशासकीय इमारत, वन्य प्राण्यांसाठी शस्त्रक्रिया कक्ष, पक्षी आणि प्राणी ठेवण्यासाठी पिंजरे अशी कामे झाली आहेत.

**<><><><><>**

सोलापूर बाजार समितीत सोमवारी ३२५ तर ३३४ गाड्या कांदा आवक नोंदवण्यात आली. यावेळी जुन्या कांद्याला प्रतिक्विंटल तीन हजार ते पाच हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला आहे, तर नवीन कांद्याला सोलापूर बाजार समितीत सोमवारी दोन हजार ते चार हजारांपर्यंत भाव होता. पावसाने भिजलेल्या कांद्याला प्रतिकिलो १० ते १५ रुपयांचा दर मिळाला.

**<><><><><>**

महिलांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतला आज भारताचा सामना श्रीलंकेबरोबर होत आहे. दुबईत संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या टी-20 क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना आज नवी दिल्लीत होत आहे. बांगलादेशानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या एका षटकात बिन बाद १५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी, तर कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.